# यज्ञ : एक सर्वश्रेष्ठ साधना

**बापट गुरुजी**

**प्रस्तावना** – हिंदू संस्कृतीमध्ये वेदांना ईश्वराचे नि:श्वसित मानले जाते. वेदांच्या उत्तरकाळात यज्ञसंस्कृतीची संस्थापना भारतीय उपखंडात करण्यात आली. ऋग्वेदाच्या बहुसंख्य ऋचा, यजुर्वेदाचे जवळ जवळ सगळे मंत्र आणि अथर्ववेदाचे काही मंत्र हे यज्ञावर रचले गेलेले मंत्र आहेत. यजुर्वेद या शब्दातच 'यजन करणे' हा अर्थ अनुस्यूत असून यजुर्वेद हा यज्ञासंदर्भात निर्माण झालेला आद्य ग्रंथ समजला जातो. यात प्रामुख्याने कर्मकांडावर भर दिला आहे. यानंतर निर्माण झालेल्या पूर्वमीमांसेमध्ये महर्षी जैमिनींनी मनुष्याने दैनंदिन आणि वर्षाचे बारा महिने कशा प्रकारे कर्माचरण करावे याचे संकलन दिले आहे. पूर्वमीमांसेनंतर चार दर्शने आणि त्यानंतर उत्तरमीमांसेची रचना करण्यात आली असे इतिहासकार सांगतात. उत्तरमीमांसेमध्ये उपनिषदे किंवा ब्रह्मसूत्रे यावर तत्त्वज्ञानपर चर्चा केलेली आढळते. उत्तरमीमांसेतील तत्त्वचिंतनाला श्रेष्ठ मानून त्याचा अभिमान बाळगणारे लोक पूर्वमीमांसेतील यज्ञ किंवा इतर कर्मकांडाला कमी दर्जाचे मानतात. वस्तुत: तत्त्वज्ञान आणि कर्म या दोन्हींचे श्रेष्ठत्व तेवढ्याच उच्च मोलाचे असून कोणत्याही एकाचा वृथा अभिमान बाळगणे चुकीचे ठरेल.

श्रीमद् आद्य शंकराचार्य अथवा श्रीरामानुजाचार्य यांसारख्या अद्वैतदृष्टीचा पुरस्कार करणाऱ्या श्रेष्ठ आचार्यांनी सुद्धा वेद हे अपौरुषेय व सत्य असल्याचे मानले आहे. अर्थात वेदांचाच भाग असलेल्या यज्ञालासुद्धा सत्यतेची प्रतिष्ठा सहजच प्राप्त आहे. जिथे जिथे जे जे उत्तम असेल ते स्वीकारण्याची नीर–क्षीर बुद्धी बाळगणे हे साधकाच्या हिताचे असते. उत्तरमीमांसा ही भारतीय अध्यात्माची इमारत असून पूर्वमीमांसा हा त्याचा पाया आहे. विज्ञानातही न्यूटनने मांडलेल्या गती आणि जडविज्ञान सिद्धांतामुळे विज्ञानाची प्रगती सुरू झाली आणि पुढे आईनस्टाईनने अजडाचे नियम प्रतिपादित केले. पण असे जर कोणी म्हणू लागले की आईनस्टाईनने मांडलेले सिद्धांत तेवढे खरे आणि न्यूटनने मांडलेले सिद्धांत पूर्ण खोटे तर ते अयोग्य ठरेल. न्यूटनने जर खरे संशोधन केले नसते तर त्याचा आधार घेऊन विज्ञानाला अणुरेणूंच्या सूक्ष्म जगात पोहोचता आलेच नसते. कोणत्याही इमारतीचा पाया हा त्या इमारतीएवढाच श्रेष्ठ असतो हे या सगळ्याचे तात्पर्य.

वेदांनी पुरस्कारलेली यज्ञसाधना ही ऐहिक प्राप्ती आणि पारलौकिक प्रगती अशा दोन्ही हेतूंनी परिपुष्ट आहे. तत्त्वचिंतनाची बैठक असलेल्या उपनिषदांनीही यज्ञसाधनेची इष्टापूर्तीरूप फलश्रुती नाकारलेली नाही.

> एतेषु यश्चरते भ्राजमानेषु
> यथाकालं चाहुतयो ह्याददायन् ।
> तं नयन्त्येता: सूर्यस्य रश्मयो
> यत्र देवानां पतिरेकोऽधिवास: ।।(मुण्डक. १.२.५)

'अग्नीच्या दीप्तिमान जिव्हांमध्ये जो यथाकाळ आहुती देऊन यज्ञ करतो, त्याला त्या आहुत्या सूर्याच्या किरणांसह तेथे घेऊन जातात, जेथे त्याला स्वीकारायला देवांचा पती (प्रमुख) विराजमान असतो' असा या मंत्राचा अर्थ आहे. ऋषींनी मंत्रामध्ये जे कर्मविधी पाहिले ते सत्य आहेत, या शब्दात मुण्डकोपनिषदात यज्ञ साधनेला पुष्टी दिली आहे(मु. १.२.१) मात्र याच उपनिषदात पुढे यज्ञ साधनेवर एक प्रमुख आक्षेप आढळतो, तो म्हणजे यज्ञामुळे स्वर्गप्राप्ती होते परंतु त्यातच जे अडकून राहतात, त्यांना मोक्षप्राप्ती होत नाही. या आक्षेपाला नंतरच्या काळात उत्तर दिले गेले ते असे की ज्या वेळेला साधक नि:स्वार्थ बुद्धीने यज्ञ आचरतो, त्या वेळेला ती स्वर्गप्राप्तीसुद्धा त्या व्यक्तीला न बाधता तो मनुष्य यज्ञ साधनेद्वारे मोक्षाप्रती निश्चितपणे पोहोचतो.

यज्ञार्थ केलेले कर्म वगळता इतर कर्म बाधक ठरते, हा तर भगवद्गीतेच्या कर्मयोगाचा पाया आहे (गीता ३.२). एवढेच नव्हे तर गीतेत 'सर्वव्यापक ब्रह्म यज्ञात सदैव स्थित आहे' अशी पुष्टीही आहे (गीता ३.१५). मनुस्मृतीने 'यज्ञशेषं

तथामृतम्' (३.८५) म्हणजेच 'यज्ञात सर्व प्रकारचे दान करून जे शेष अन्न उरेल ते अमृत होय' अशी दिलेली ग्वाही म्हणा अथवा 'यज्ञशिष्टाशिन: सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषै: ।' (गीता ३.१३) म्हणजेच 'यज्ञ करून अवशिष्ट राहिलेल्या भागाचे ग्रहण करणारे सर्व पापांपासून मुक्त होतात' अशी गीतेतील उक्ती म्हणा, त्या सर्वांमध्ये यज्ञपरंपरेचा उद्घोषच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे केलेला आढळतो.

दुर्दैवाने कालौघात स्वार्थपरायणता व आत्मप्रौढी यामुळे इतर कोणत्याही साधनेत जशी अपप्रवृत्ती बळावते, तशीच यज्ञामध्येही अमुक प्रकारचे हवन अमुक दिशेने करावे किंवा तुपाचे हवन अमुक पद्धतीने, अमुक प्रकारे, अमुक प्रमाणातच करावे इत्यादी कर्मकांडाचा दंभ माजला आणि एवढा अनाचार बळावला की त्यामुळे 'ईशशक्तीला प्रकाशाद्वारे संदेश पाठवणे' हा मूळ हेतू बाजूला पडून यज्ञ संस्कृतीच बहिष्कृत झाली. त्याचा अर्थ असा नव्हे की यज्ञ परंपरेतच काही तथ्य नाही.

गीतेला अपेक्षित असणारा यज्ञ हा ज्ञान, भक्ती अथवा कर्म मार्गातील अनेक साधनांद्वारे केलेला नि:स्वार्थ 'जीवन यज्ञ' या स्वरूपातला असला तरी त्यात तिसऱ्या अध्यायात वर्णन केलेला पूर्वमीमांसक पुरस्कृत वैदिक यज्ञही अंतर्भूत आहे, हे सुद्धा लक्षात घ्यावे लागेल. 'स्व' बरोबरच समाज विकासासाठी प्रकाशशक्तीची आराधना या यज्ञ संस्कृतीतील मध्यवर्ती संकल्पनेला कुठेही आणि कधीही बाधा येत नाही. सृष्टीच्या मुळारंभी असलेली ही प्रकाशशक्ती यज्ञसंकल्पनेसह स्वीकारण्यासाठी सर्व पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनांचा त्याग घडला पाहिजे, ही त्या प्रकाशशक्ती स्वीकाराची पहिली अट आहे.

**यज्ञारंभ** – प्राचीन काळी मानवी जीवन संपूर्णत: निसर्ग शक्तीवर अवलंबून होते. पंचमहाभूतांच्या प्रकटीकरणावर पूर्णत: अवलंबून असलेल्या प्राचीन मानवाने सर्वप्रथम देवत्व बहाल केले ते त्या पंचमहाभूतांनाच. यज्ञातल्या प्रथम आहुती पंचमहाभूतांना देण्याची प्रथा अशी सुरू झाली. त्यानंतर पुढील काळात इतर शक्तिप्रतिकांची भर त्यात पडली आणि त्यासंबंधी रचलेल्या अधिकीच्या ऋचा यज्ञसाधनेत समाविष्ट झाल्या. यज्ञज्योतीच्या प्रज्वलनामागे जर उदात्त हेतू असेल तर तुमचा संदेश योग्य ठिकाणी पोहोचविण्याचे कार्य योग्य प्रकारे घडते. हे ज्ञान प्राचीन ऋषिमुनींना अवगत झाले असावे म्हणून त्यांनी यज्ञाला हव्यवाहन असे म्हटले आहे. हव्यवाहन म्हणजे हविर्द्रव्याचे वहन करणारा. अर्थात यज्ञात हवन केलेले हविर्द्रव्य जसेच्या तसे कुठेतरी जाते असे अभिप्रेत नाही तर ते द्रव्य हवन करताना जो संदेश पाठवला जातो तो योग्य ठिकाणी पोहोचतो असा अर्थ अनुस्यूत आहे. त्या संदेशाबरोबरच, त्या शक्तिस्वरूपाबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञताही पोहोचते.

हे संदेश निश्चितस्थळी पोहोचविण्याचे कार्य यज्ञातली प्रकाशशक्ती करते. त्यामुळे यज्ञात प्रमुख असते ती प्रार्थना! पहिल्या पाठापासून आपण बघत आलो की यज्ञात उच्च हेतूने प्रज्वलित केलेल्या प्रकाशाला आणि देवांना केलेल्या प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यज्ञसन्मुख केल्या जाणाऱ्या प्रार्थनांचे मुख्य ध्येय म्हणजे यज्ञातली प्रमुख देवता अर्थात ब्रह्मशक्तीला संतुष्ट करणे, असे प्राचीन काळापासून मानले गेले आहे. पूर्वमीमांसाकारांनी तर विश्वाची उत्पत्ती सुद्धा यज्ञापासून झाली असे मानले आहे (ऋ. १०.१.३०). पुराणांमध्येही या संदर्भात अनेक कथा आढळतात. अर्थात या कथा रूपकात्मक आणि अतिप्राचीन काळातल्या असल्याने त्यांची सत्यता तपासता येत नाही. परंतु विश्वाचा उगमस्रोत असणाऱ्या शक्तींपर्यंत पोहोचण्याचे यज्ञ हे एक उत्तम साधन आहे असेच प्राचीन काळातल्या तत्त्ववेत्त्यांना सूचित करावयाचे होते हे त्यातले तात्पर्य.

**प्रकाशशक्ती आणि विज्ञान** – अंतर्मुख अवस्थेतल्या ऋषिमुनींना सृष्टीचे जे रहस्य समजले ते त्यांनी प्राचीन ग्रंथाद्वारे मांडले. आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातूनही त्यातले बरेच निष्कर्ष आज सिद्ध करता येतात हे आपण पाहिले आहे. अर्थात अध्यात्म हा मुळातच अनुभवगम्य प्रांत असल्या कारणाने व विज्ञानाला ऐंद्रिय ज्ञानाची सीमा असल्याने अध्यात्माचे सगळेच निष्कर्ष विज्ञानाच्या परिभाषेत मांडता येतीलच असे नाही. मात्र 'विज्ञान' म्हणजे 'विशेष ज्ञान' असे समजून आधुनिक वैज्ञानिक निष्कर्षांकडे शोधक दृष्टीने पाहणाऱ्याला विज्ञानातही ईशशक्तीची किमया जाणवेल यात शंका नाही.

यज्ञसाधनेचे मर्म असणारा प्रकाश विश्वातल्या प्रत्येक अणुमध्ये समाविष्ट आहे. अग्नी हे ज्याचे स्थूल रूप आहे, ते पंचमहाभूतांपैकी एक असे 'तेजतत्त्व' अर्थात प्रकाश अजून कोणालाही बघता आलेला नाही. प्रकाश पडलेली वस्तू आपण बघतो पण प्रत्यक्ष प्रकाश मात्र विज्ञानालाही बघता आलेला नाही. तो काही वेळेला पुंजाच्या स्वरूपात तर काही वेळा तरंग स्वरूपात असतो असे शास्त्रज्ञ सांगतात. आईनस्टाईनने प्रकाशावर अनेक सिद्धांत मांडले. अर्थात प्रत्यक्ष प्रकाशाचे वर्णन तोही करू शकला नाही. सापेक्षता

सिद्धांताला अनुसरून प्रकाशाची गती त्याला पाहणाऱ्या निरीक्षकाच्या गतीनुसार बदलत नाही तर ती कायम असते. प्रकाशाच्या दिशेने प्रवास करणाऱ्या आणि विरुद्ध दिशेने प्रवास करणाऱ्या अशा दोन्ही निरीक्षकांना प्रकाशाची गती एकसारखीच भासते. निरीक्षक जसजसा प्रकाशवेगाच्या जवळ जवळ पोहोचू लागतो तसतशी कालाची सापेक्ष गती कमी होते अणि अवकाशाची सापेक्ष लांबी आकुंचित होते. म्हणजे स्थळ आणि काळ ही निश्चित समजली जाणारी परिमाणके सापेक्ष ठरतात, परंतु प्रकाश मात्र सापेक्षतावादातही अनादि, अनंत आणि शाश्वत सिद्ध होतो. प्रकाशाच्या या आणि अशा अनेक गंमती जंमतींमुळे त्याच्या नियमांचा अभ्यास करणाऱ्या वैज्ञानिकांवर 'नेति नेति' म्हणण्याची वेळ आली आहे. 'तर्कशास्त्र आणि पंचेंद्रियांवर आधारित असणाऱ्या निरीक्षणाच्या पलिकडे असणारा प्रकाश हा विश्वाच्या उत्पत्तीस कारणीभूत असणाऱ्या अज्ञात, निराकार अशा सूक्ष्म शक्तीचे प्रथम प्रकटीकरण आहे' असे विधान आधुनिक शास्त्रज्ञ पीटर रसेल याने केले आहे. रसेल पुढे म्हणतो, 'जाणीव आणि नेणीवेच्या सीमारेषेवर असणारा भौतिक विश्वातला प्रकाश म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' या आत्मज्ञानाच्या प्रकाशापर्यंत घेऊन जाणारा एक पूल आहे!' (पीटर रसेल, २००२, फ्रॉम सायन्स टू गॉड)

प्रकाशावर एकाग्रता केल्याने स्वकल्याण कसे साधता येते याचा उहापोह आपण वैज्ञानिक संदर्भ देऊन विस्तृतपणे केला आहे. या संदर्भातला अजून एक पैलू, विज्ञानाचा आधार घेऊन आपल्याला उलगडता येतो. विज्ञानानुसार मानवी गुणसूत्रांमध्ये त्या त्या व्यक्तीच्या भावी जीवनाचा आलेख लिहून ठेवलेला असतो. हा आलेख विशिष्ट रंगाद्वारे वाचता येतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अनारोग्याला सामोरे जावे लागते, तेव्हा कोणत्यातरी कारणामुळे एखाद्या रंगाची कमतरता एखाद्या विशिष्ट गुणसूत्रात निर्माण झालेली असते. रंगाची ही कमतरता व्यक्तिमानपरत्वे बदलू शकते. एकाच व्यक्तिमत्त्वातही कालमानानुसार ही गरज बदलू शकते. उदा. फ्लिकर उपकरणातून बाहेर पडणारा पांढरा प्रकाश एकाच वेळी अनेक लोकांना जर मिनिटभर बघायला सांगितला तर काही जणांना पिवळा, काहींना निळा, काहींना काळा , काही जणांना जांभळा असा प्रत्येकाला भिन्न भिन्न रंग जरा वेळाने दिसू लागतो.

वस्तुत: निसर्गाने प्रत्येकाला सारखेच डोळे दिले आहेत, त्याच्यातून मिळणारे संदेश आणि आतमध्ये उमटणाऱ्या प्रतिमेची प्रक्रियाही सारखी आहे, तरीसुद्धा हा फरक पडतो हे विशेष. एवढेच नव्हे तर मुळात कोणताच रंग नसलेली एक विशिष्ट आकृती संशोधकांनी एका बिनरंगीत टी. व्ही. वर जोराने गोल गोल फिरवल्यावर अनेकांना त्यातही वेगवेगळे रंग दिसले. असे मार्टिन गार्डनर या लेखकाच्या 'अम्युझिंग एक्पेरिमेंट्स' या पुस्तकात नमूद आहे. सारांशाने 'रंग' हे विविध तरंगलहरींच्या प्रकाशाचे व्यक्तिसापेक्ष अनुभवास येणारे रूप आहे; मूळ प्रकाशाला स्वत:चा असा कोणताही रंग नाही. त्या त्या व्यक्तीला ज्याची गरज आहे त्यानुसार त्याला तो रंग दिसतो आणि त्याचा मेंदू तेवढाच रंग ग्रहण करतो. या सिद्धांताचा उपयोग करून आधुनिक वैद्यकीय शास्त्राने प्रकाश उपचार पद्धतीचा (लाईट थेरपी) विकास केला आहे. एखाद्या व्यक्तीसमोर सप्तरंगाची पट्टी ठेवली तर ज्या रंगाची त्या व्यक्तिमत्त्वाला जरुरी असते, तो रंग ते व्यक्तिमत्त्व आपोआप खेचून घेते. हे कार्य मेंदू नामक शरीरातल्या यंत्राकडून आपोआप घडते, त्यासाठी वेगळे काही प्रयत्न करावे लागत नाहीत. या प्रक्रियेत एकाग्रता साधता आली तर मेंदू ती रंगशक्ती अधिक परिणामकारक रीत्या खेचून घेऊ शकतो.

मात्र असा कोणता रंग आपल्याला कमी पडलेला आहे हे शोधणे थोडे जिकिरीचे ठरू शकते. नीट विचार केला तर लक्षात येईल की पांढऱ्या रंगामध्ये सर्व रंग सामावलेले असतात. गायत्रीच्या प्रात:कालीन ध्यानमंत्रात 'मुक्ताविद्रुम हेम नील धवलच्छायै:....' असे वर्णन आहे. याचा अर्थ पांढरा रंग विमुक्त केल्यावर त्यातून सातही रंगांची निर्मिती होते. यज्ञज्योतीमध्येही सात रंग सामावलेले आहेत, यातल्या प्रत्येक रंगाची शक्ती निरनिराळी आहे आणि या सर्व शक्ती प्रकाशशक्तीमध्ये एकवटल्या आहेत. फ्लिकरमधून बाहेर पडणारा प्रकाश मनुष्याला एखाद्या मिनिटाच्या वर सहन करता येत नाही कारण याचे दुष्परिणाम होतात. या दुष्परिणामांचे वर्णन ग्रे वॉल्टर नावाच्या शास्त्रज्ञाने केले आहे. परंतु तसा कोणताही धोका नैसर्गिक अग्नीची उपस्थिती असणाऱ्या यज्ञ प्रकाशात नाही. यज्ञाचा प्रकाश मानवी डोळ्यांना सहज सहन करता येतो. यज्ञ साधना करणाऱ्या मनुष्यातली रंगांची कमतरता यज्ञप्रकाशावर एकाग्रता केल्यामुळे सुलभतेने, कोणतेही दुष्परिणाम न होता भरून निघते असा यातून निष्कर्ष काढता येईल.

योगशास्त्रानुसार सप्तचक्रांचे भेदन करत कुंडलिनी शक्तीचे उर्ध्वगमन झाल्याशिवाय आत्मोन्नती साधता येत नाही. या सप्तचक्रांनाही योगशास्त्राने विशिष्ट रंग दिला आहे. उदाहरणार्थ मूलाधार चक्राला रक्तवर्ण तर स्वाधिष्ठान चक्राला हेम रंग दिला गेला आहे. योगशास्त्र म्हणते की त्या त्या विशिष्ट रंगावर

एकाग्रता केल्यास ते ते चक्र जागृत होऊ शकते. याचाच अर्थ असा की यज्ञज्योतीवर केलेले ध्यान चक्रोपासनेकरिता सुद्धा पूरक आहे.

**प्रकाशशक्ती स्वीकाराचा सत्संकल्प –** देणारा सहस्र हस्ताने देत असला तरी घेणाऱ्याचा जर घ्यायचा संकल्पच नसेल तर त्याची ओंजळ मोकळी ती मोकळीच रहाणार. तद्वतच प्रकाशातही अपरिमित शक्ती साठवलेली असली तरी त्याचा उपयोग करून घेणे न घेणे हे सर्वस्वी आपल्याच हाती असते. प्रकाशकण म्हणजेच फोटॉन हा इलेक्ट्रॉनपेक्षा सूक्ष्म समजला जातो. इतका की शास्त्रज्ञांनी फोटॉनचे वस्तुमान शून्यवत् मानले आहे आणि विज्ञानानुसार जे अधिक सूक्ष्म ते अधिक गतिमान अशी स्थिती असते. प्रख्यात अंतराळवीर युरी गागारीनने आपल्या अंतराळप्रवासाचे वर्णन केले आहे. त्यात लांबून दिसणाऱ्या पृथ्वीचे वर्णन करताना तो म्हणतो की, 'आकाशात सूर्य दिसत होता, त्या प्रकाशाने पृथ्वी प्रकाशित झाली होती, त्यावेळी अंतराळयानाभोवती मात्र अंधार पसरलेला होता. याचाच अर्थ असा की ज्या प्रकाशकणांनी त्याला पृथ्वीची माहिती दिली, त्या प्रकाशकणांनी तथाकथित अंधारातूनही प्रवास केला. प्रकाशशक्तीला अंध:काराचीही मर्यादा नसते, हे यातले सांगण्याचे तात्पर्य.

प्रकाशाशिवाय कोणत्याही वस्तूचे ज्ञान संभवत नाही, हे प्रचीतीचे सत्य आहे. याचाच अर्थ असा की जेव्हा हा प्रकाशकण एखाद्या वस्तूकडून आपल्यापर्यंत येतो तेव्हा तो त्या वस्तूची माहिती घेऊन येत असतो. अशी निरनिराळी माहिती पोटात साठवून प्रकाशकण वातावरणात सर्वत्र गतिमान असतात. तरीही आपल्याला एका पदार्थाची माहिती होते, दुसऱ्याची नाही. उदाहरणार्थ समान उंचीच्या दोन व्यक्ती, बाजूबाजूला उभे राहून समान पातळीवर परंतु विरुद्ध ठेवलेल्या दोन वस्तूंकडे पहात आहेत. डावीकडील व्यक्ती उजवीकडील वस्तू पहात आहे तर उजवीकडील व्यक्ती डावीकडील वस्तू पहात आहे. त्यांच्या नजरेच्या छेदनबिंदूत असणाऱ्या प्रकाशकणाकडे दोन्ही वस्तूंची माहिती असणे साहजिक आहे, तरीही त्या माहितीत दोन वस्तूंच्या रंग, आकार इत्यादींची सरमिसळ न होता, त्या व्यक्तींना ते जी वस्तू पहात आहेत त्याचीच माहिती मिळते. कारण एकच, तशी माहिती घेण्याचा बघणाऱ्याचा संकल्पच नसतो. ज्याक्षणी असा संकल्प होईल त्याक्षणी वातावरणात व्याप्त प्रकाशकणांकडून संबंधित माहिती मिळायला सुरुवात होईल. उन्हात जाऊन ऊन खाण्याचा संकल्प असेल, तर तसे घडेल. प्रकाशातील शक्तीचा अनुभव हा तदनुषंगिक संकल्पाशिवाय शक्य नाही व संकल्प जेव्हा होईल तेव्हा प्रकाशकणांकडून तसा प्रतिसाद मिळेल हे निर्विवाद.

**प्रकाशशक्तीच्या साक्षात्काराची पथ्ये –** सन्मान, संगतीकरण आणि दान ही यज्ञाची त्रिसूत्री आहे याचे आपण यापूर्वीच अवलोकन केले आहे . थोड्या आणखी निराळ्या शब्दात सांगायचे म्हणजे लहानांनी मोठ्यांना मान द्यावा, सर्वांनी एकत्रतेच्या माध्यमातून साधना करावी आणि काहीतरी नि:स्वार्थ त्याग करीत रहावा, हे यज्ञसाधनेच्या फलिताचे मर्म आहे.

कोणतीही क्रिया एकट्या व्यक्तीकडून यशस्वी होऊ शकत नाही. अमुक यश केवळ माझ्यामुळे मिळाले असे जर कोणी म्हणत असेल तर तो अहंमन्यतेचा आविष्कार आहे. साध्या पाककृतीतही बियाणं रुजवणाऱ्या शेतकऱ्यापासून ते पाक करणाऱ्या गृहिणीपर्यंत सर्वांचा सहभाग असतो. त्यात पुन्हा बियाणाला रोपाचं रूप देणाऱ्या व देहाला पचनशक्ती प्रदान करणाऱ्या निसर्गशक्तीचा सहभाग असतो तो वेगळा! याप्रमाणे प्रत्येक कार्यात समाजाच्या कित्येक घटकांचे या ना त्या रूपात योगदान असते. त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात व्यक्ती व शक्तींविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते. कृतज्ञतेचा हा संदेश परिणामकारक रीत्या योग्य स्थळी पोहोचविण्याचे उत्तम साधन म्हणजे यज्ञ.

बाह्य यज्ञसाधनेतून स्वीकारलेली प्रकाशगती, ही मेंदूमध्ये मात्र शून्यासहित स्वीकारता आली पाहिजे. देहचालनेपासून विश्वचालनापर्यंत कोणती तरी शक्ती अदृश्य पडद्याआडून संचालन करते आहे, त्यात आपले 'कर्तृत्व' अर्थार्थी काही नाही याची निश्चित जाणीव होणे म्हणजेच हवन करताना म्हणावयाच्या 'इदं न मम' चे ज्ञान होणे. मेंदूत निर्माण झालेली ही अहंकारशून्यता स्वीकारलेल्या प्रकाशगतीतून असंख्यात शक्ती निर्माण करेल.

विश्वाचा प्रवास समतेकडे होत आहे असे उष्णतागति शास्त्राचा तिसरा नियम सांगतो. त्याच विश्वनियमाला अनुसरून यज्ञसाधकाने समत्वाचे प्रतीक असणाऱ्या प्रकाशावर एकाग्रता करताना स्वत:तही अंतर्बाह्य समता प्रस्थापित करणे सर्वप्रथम आवश्यक आहे. ही समता साधते ती एकत्रतेतून! एकत्र या, एकत्र साधना करा आणि एकत्र उन्नती साधा असा आशीर्वादच मुळी ऋग्वेदाच्या उपसंहारात्मक संज्ञान सूक्तात आहे. रोज एकत्र येणे आजच्या

आधुनिक काळात शक्य होईलच असे नाही; परंतु दर महिन्यात किमान एक दिवस तरी संकल्पपूर्वक एकत्र येऊन यज्ञसन्मुख एकाग्रता करावी. सद्हेतूपूर्वक केलेल्या सत्संकल्पाच्या पूर्तीसाठी प्रकाशशक्तीचेच बळ मिळेल हे निश्चित.

जसा कृतज्ञतेशिवाय आशीर्वाद नाही, एकत्रतेशिवाय शक्ती नाही तसाच त्यागाशिवाय यज्ञ नाही. हवन म्हणजेच 'हाव नको'. आपल्याला सतत सुखाची हाव लागलेली असते. दिवसातला प्रत्येक क्षण हा केवळ स्वसुखाचा विचार करण्यातच बहुधा दवडला जात असतो. स्वत:पुरता विचार करण्याच्या या सवयीचा त्याग दिवसातील निदान काही काळ तरी करता यायला हवा. म्हणजेच जागृतीतील १६-१७ तासांपैकी निदान एखादा तास कोणत्या तरी नि:स्वार्थ सेवेत घालविता यायला हवा, मग ती सेवा सामाजिक असो वा आध्यात्मिक असो.

हेही जर जमणारे नसेल तर जिथे असे सामाजिक वा आध्यात्मिक सेवाकार्य चालते अशा कोणत्याही संस्थेसाठी निदान धनाचा तरी त्याग करता यायला हवा.

ह्या सत्कृत्याची जोड देऊन जेव्हा यज्ञज्योतीवर प्रत्यक्ष अथवा त्याच्या मानसिक प्रतिमेवर कमीत कमी १२ मिनिटे रोज एकाग्रता साधली जाईल तेव्हा भविष्यबदलाचे संकेत पेशीपेशीत सामावायला सुरुवात होईल.

सूर्यचक्र काळाचा कालावधी सुमारे ७ ते ११ वर्षांचा मानला जातो. त्याच काळात शरीरपेशींचे चक्रही पूर्ण होते. यज्ञसाधनेचे चक्रही त्याच नियमांप्रमाणे फळ देते. पूर्वकर्मांचा हिशेब आणि वरीलप्रमाणे प्रयत्नांचे सातत्य यांचे समीकरण जेव्हा जुळेल तेव्हा साधकाला प्रकाशशक्तीचा साक्षात्कार होईल हे निश्चित!

प्राचीन भारतात त्याकाळी अनुसरल्या जाणाऱ्या यज्ञसाधनेचे परिणाम कालातीत आहेत. 'तेव्हा ठीक होते हो, या काळात कसचा यज्ञ?' असा विचार जर कोणी केला तर ज्या प्रकाशाच्या साहाय्याने गेली काही लाख वर्षे ही सृष्टी टिकून आहे, त्या प्रकाशशक्तीच्या सामर्थ्यावरच अविश्वास दाखवल्यासारखे होईल. म्हणूनच भगवद्गीतेत (१८.५), 'यज्ञ, दान आणि तप हे केलेच पाहिजे' असे निश्चित मत नोंदवले आहे.

हे पथ्य सर्वांसाठी आहे. त्यात धर्म, जात, लिंग, पंथ असा कोणताही भेद अपेक्षित नाही. वेदांचा अभ्यास केलेल्या वेदकालीन स्त्रिया, ज्यांना ऋषिका अशी संज्ञा आहे, त्यांनी रचलेल्या व अग्नीची प्रार्थना करणाऱ्या हवनात्मक ऋचा देखील वेदांमध्ये समाविष्ट केलेल्या आढळतात. महर्षी याज्ञवल्क्यांबरोबर ब्रह्मचर्चा करणारी गार्गी वेदवाङ्मयात प्रसिद्ध आहेच. रुद्रसूक्तावर विवरण करणारे जाबाल ऋषी दासीपुत्र होते. याचाच संकुल अर्थ असा की वेदांचा व वेदप्रणित यज्ञसाधनेचा अधिकार सर्वांना आहे. वैयक्तिक साधना कोणतीही असो, त्याला यज्ञसाधनेची जोड जर दिली तर त्या साधनेतून निर्माण होणाऱ्या सत्कर्मांचा सुद्धा गुणाकारच होईल व असा क्षण हा त्या साधकाच्या आयुष्यातील भाग्योदयाचा क्षण असेल, हे निश्चित!

**यज्ञपूर्तता –** 'यज्ञसाधना' हा विषय मुळात फार मोठा आहे. त्यावर जेवढे बोलले, लिहिले जाईल तेवढे कमीच आहे. तरीदेखील संक्षिप्त रूपात हा विषय मांडला, कारण आपल्या पूर्वजांकडून आपल्याला वारसाहक्काने मिळालेल्या या वैभवाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. प्राचीन भारतात निर्माण झालेली यज्ञसाधना खरोखर एक कल्पवृक्ष आहे. आध्यात्मिक आणि वैज्ञानिक असे संदर्भ तपासून, बुद्धी आणि ज्ञानचक्षू वापरून आपण या कल्पवृक्षाची परिपूर्ण माहिती करून घेतली. पूर्वजांनी सांगितलेली यज्ञसाधना सर्वतोपरी श्रेष्ठ आहे हे एकदा लक्षात आल्यानंतर, अश्रद्धेचे करंटेपण टाकून यज्ञसाधनेचे अनुसरणही करता आले पाहिजे. असे अनुसरण करीत असताना त्यातले रूढींचे अवडंबर कमी करून ती साधना अधिकाधिक ज्ञानाधिष्ठित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नुसते ज्ञान मिळाले आणि ते वापरलेच नाही किंवा त्याचा विपर्यास केला तर त्याचा काही उपयोग होत नसतो. तसे करणे म्हणजे मनुष्य जन्म फुकट घालवण्यासारखे होईल. संत कबीर म्हणतात,

> पोथी पढ पढके जग मुआ, पंडित बना न कोय।
> ढाई अक्षर प्रेम का, पढे सो पंडित होय ।।

ज्ञानप्राप्तीनंतर ईश्वराप्रती असणारी श्रद्धा आणि भक्ती बळकट झाली तरच त्या ज्ञानाचा उपयोग आहे. यज्ञ साधना सुरू केल्यानंतर साधकाच्या लक्षात येईल की या कल्पवृक्षाकडे जे मागाल ते मिळते! मात्र यज्ञामध्ये हविर्द्रव्य अर्पण केल्यावर ताबडतोब कोणती तरी देवता प्रसन्न होऊन हातात अमृताचा घडा ठेवेल अशी जर कोणाची कल्पना असेल तर तिचा तात्काळ त्याग करावा. कंदिलाचा प्रकाश समत्वाने सर्वत्र पडण्यासाठी त्यावरील काजळी जशी सतत पुसावी लागते, त्याचप्रमाणे अपेक्षित शक्तिप्राप्तीसाठी जन्मजन्मांतरीचे कुसंस्कार प्रथम पुसून जाणे आवश्यक असते. त्यासाठी

...पान ५८ वर

पान ५३ वरून ...यज्ञ : एक सर्वश्रेष्ठ साधना

आवश्यक असते अहंकारशून्यतेसहित निरपेक्ष भावनेने केलेली यज्ञसन्मुख एकाग्रता. आयुष्यात निसर्गनियमानुसार व माझ्या सत्कर्मांनुसार जे काही मिळणार आहे तेच परमामृत समजून त्याचा आनंदाने स्वीकार करून देह सत्कार्यासाठी झिजवणे यज्ञ संस्थेला अपेक्षित आहे.

यज्ञामध्ये 'इदं न मम' म्हणजे 'हे माझे नाही' हा भाव मनात बाळगून जेव्हा आपण सर्वोच्च त्याग करू, सेवा करू, भक्ती करू तेव्हा स्व-शक्तीपुनर्मेळाच्या सिद्धांतानुसार अत्युच्च कोटीचा निसर्गनिर्मित 'फीडबॅक' आपल्याला निश्चितपणे मिळू शकेल. योग्य मार्गाने लवकर तुरुंगातून सुटण्याची युक्ती शोधण्याऐवजी तुरुंगातल्या वास्तव्यातच अनेकविध सोयी कशा मिळत राहतील याचा विचार करणारा कैदी हा शेवटपर्यंत कैदच भोगत राहतो, हे समजून घेऊन आपणही यज्ञरूपी कल्पवृक्षाकडे कोणतीही, अशाश्वत सुखाचा परिपोष करणारी सांसारिक मागणी करण्यापेक्षा अशी मागणी करावी की त्यापलिकडची उच्चतम मागणी मानवी जीवनामध्ये असूच शकणार नाही. अशी सर्वश्रेष्ठ मागणी एकच आहे, ती म्हणजे अविरत अनुभवास येणाऱ्या सुखदु:खाच्या फेऱ्यांतून, जन्म-मरणाच्या रहाटगाडग्यातून कायमची मुक्ती! अशी मोक्षावस्था प्राप्त करण्यासाठी यज्ञेश्वर नारायणाकडे प्रत्येक भक्ताने एकच प्रार्थना करायची आहे,

''हे यज्ञेश्वरा! तू सामर्थ्यवान आहेस, शक्तिमान आहेस आणि तरीही अहंकारशून्य आहेस. तू मौन साधले आहेस, सर्वांप्रती समता प्रस्थापित केली आहेस. तुझ्या त्यागातूनच विश्वाचे पालन होते आहे. आज मी नम्रतेने तुला अभिवादन करतो आहे, कृतज्ञतेने तुझ्यावर एकाग्र होतो आहे. तुझी त्यागवृत्ती माझ्यातही स्पंदित होऊ दे, तुझी समता माझ्याही अंत:करणात प्रतिबिंबित होऊ दे, तुझे चित्र माझ्या अणु-रेणूंमध्ये उमटू दे! तूच सर्वांभूती असलेला सर्वेश्वर आहेस, सर्वात्मक आहेस. तुझ्यावर साधलेली एकाग्रता ही मला तुझ्याच वेगाने तुझ्याजवळ आणेल, असा मला विश्वास आहे. अखंड श्रद्धेने आणि पूर्ण शरणागतीने मी तुझ्यावर एकाग्र होतो आहे, माझा स्वीकार कर!''

ॐ शांति: शांति: शांति:।

(श्रीगुरु सत्संग मंडळ वाशी येथील २०० व्या सत्संग बैठकीच्या निमित्ताने प. पू. सद्गुरु श्री. बापट गुरुजी यांनी केलेल्या व्याख्यानाच्या आधारे.)